# प्रेसनोट

**जा. क्र. ५३३/ माहिती कक्ष/ वार्तापत्र – २५७/२०१७ भंडारा दिनांक २६/०७/२०१७.**

**भंडारा :** – ध्वनिप्रदुषण ही एक जटील समस्या झाली असून ध्वनिप्रदुषण करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा आदेश शासनाने काढला आहे. सण उत्सवाला सुरुवात झाली आहे. त्याचबरोबर दिनांक २५/०८/२०१७ पासुन गणेश उत्सवाला सुरुवात होणर असल्याने सर्वोच्च न्यायालयाने डि. जे. च्या आवाजावर निर्बध घातले असुन कोणताही सार्वजनीक कार्यक्रम असला की डि. जे. लावला जातो. डी. जे. च्या आवाजामुळे होणारे ध्वनी प्रदुषण टाळण्याकरीता कठोर पाहुले उचलण्यात येत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करण्याचे बंधन गणेश उत्सव मंडळावर आहे. त्याची अमलबजावणी पोलीस विभागाने घेतली आहे. त्यामुळे पोलीस विभागाने डी. जे. आवाज अधिकाअधिक ६५ डेसिबल पेक्षा अधिक नको असे आवाहन केले आहे. गणेश उत्सव मंडळाने कायदयाचे पालन करावे न्यायालयांच्या निर्देशानुसार ध्वनी प्रदुषणावर (नियत्रंण नियमन ) २०००च्या कलम ३ (१) आणि ४ (१) नुसार आवाजांच्या गुणवत्तेची मानके निश्चीत केली आहे.

१. ध्वनि क्षेपकाचा वापर फक्त सकाळी ०६.०० ते रात्रौ १०.०० वा पर्यंत पोलीस स्टेशन प्रभारी अधिका–यांच्या परवानगीने करू शकतात.
२. ध्वनि क्षेपकाचा रात्री १०.०० ते सकाळी ०६.०० वा पर्यंत वापर करण्यास संपूर्ण बंदी आहे.
३. सकाही ०६.०० ते रात्री १०.०० वा. पर्यंत खालील संबंधीत झोनमध्ये डेसिबल मानकांचे कोणकडूनही उल्लंघन होणार नाही.

| अ.क्र. | क्षेत्राचा प्रवर्ग | डेसिबल मर्यादा |
|---|---|---|
| | | ०६.०० वा. ते २२.०० वा. |
| अ | शांतता झोन | ५० |
| ब | निवासी झोन | ५५ |
| क | वाणिज्य झोन | ६५ |
| ड | औद्योगिक झोन | ७५ |

( टिप – शांतता झोन म्हणजे रूग्णालय, शैक्षणिक संस्था न्यायालय यांचे सभोवतालचे कमीत कमी १०० मीटरचे क्षेत्र )

४. ध्वनि क्षेपक/ध्वनि वर्धक यांची आवाजांची तीव्रता वरील मानकांचे उल्लघन करण्याइतपत राहणार नाही.
५. ध्वनि क्षेपकामुळे वाहतुकीस अडथळा होणार नाही. तसे आढळल्यास ध्वनी क्षेपक अन्यत्र बसविण्यास पोलीस अधिकारी यांनी सुचना दिल्यास त्याचे पालन करणे बंधानकार आहे. या निर्धारीत मर्यादेपेक्षा अधिक आवाजाचा डि.जे मिरवणुकीत आढळल्यास ध्वनी प्रदुषण नुसार कारवाई करण्यात येणार आहे.त्यामुळे प्रदुषणांच्या तीव्रतेनुसार कायदयात शिक्षेची तरतुद करण्यात आली आहे.

तसेच वाहनांची दिवसेंदिवस वाढत चाललेली गर्दी त्या माध्यमातून होणारे ध्वनिप्रदूषण, सण उत्सव 'डीजे' आणि फटाक्यांचा आवाजामुळे ध्वनी प्रदुषणामध्ये भर पडत आहे. हे प्रदुषण रोखण्यासाठी शासनाकडून सातत्याने जनजागृती करण्यात येते. मात्र याला फारसा प्रतिसाद मिळत नाही. त्यासाठी आता शासनाने प्रदुषणाचे नियम कडक केले आहे. ध्वनी प्रदुषणाचे दुष्परिणाम समाजाच्या प्रत्येक घटकावर जाणवु लागले आहे. हे प्रदुषण नियत्रीत करण्यासाठी लोक सहभागही तितकाच महत्वाचा आहे. अलिकडे तर प्रदुषण रोखण्यासाठी शालेय विदयार्थ्याची शासन मदत घेत आहेत. नागरीकांनी काही नियम पाडलेत, तर प्रदुषणाची तिव्रता कमी होवु शकते. **त्या अनुसंगाने भंडारा जिल्हा पोलीस विभागाने ध्वनी प्रदुषणास तक्रारी स्विकारण्यासाठी 'टोल फ्री क्रमांक' १०० पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा ०७१८४ – २५२४००, व्हॉटसुअप मो.क्र. ९४०५८३११००, ९४०५८४११००, महिला हेल्पलाईन क्रमांक १०९१ तसेच आपले सरकार ॲप, प्रतिसाद ॲप, सिटीजन कॉप, भंडारा पोलीस फेसबूक व ट्वीटर यावर करण्याचे आवाहन पोलीस अधिक्षक मा. विनीता साहू यांनी केले आहे.**

तसेच गणेश मुर्ती या आज सर्रासपणे पीओपी च्या वापरल्या जातात. आणि त्यांना केमीकल रंगाने रंगवीले जाते. या मुर्तींचे जलाशयात टाकल्यानंतर तेथील जीवसृष्टी व मानवास अपायकारक आहेत. यामुळे जलाशय तर उथळ आले आहेतच पण मासे व ईतर जलाशयात असणारे अन्नपदार्थ मानवी सेवनात आल्यास गंभीर आजार होतात. सर्व जनतेस भंडारा पोलीस विभागाकडून आवाहन करण्यात येते की, ईको फ्रेन्डली गणेशोत्सव साजरा करण्यास प्राधान्य दयावे.पर्यावरण संरक्षण करण्यासाठी पोलीसांनी एक पाउल पुढे टाकले आहे. आता फक्त गरज आहे आपल्या सहकार्याची.

ध्वनी प्रदुषण केल्यास पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ व ध्वनिप्रदुषण ( नियमन व नियंत्रण ) नियम २००० अन्वये गणेश मंडळाने पाळावयाच्या आहेत. अन्यथा कलम १५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात येईल व त्यास ३ ते ५ लाख रुपये दंड ३ वर्षाची तुंरुगवासाची शिक्षा होवु शकते. तसेच शिक्षा होऊन सुध्दा असे गुन्हे चालु ठेवल्यास पोलीस कार्यवाही करण्यात येणार आहे. यावर करण्यात आलेली बंदी रात्री १० ते सकाळी सकाळी ०६.०० वा. पर्यत ध्वनी क्षेपक, पब्लीक अॅड्रेस सिस्टमचा उपयोग करता येणार नाही. लाऊडस्पिंकर, फटाके, वाद्य, वाजविण्यास उच्च न्यायालयाने बंदी घातलेली आहे.

(एम.एम. सिडाम)
**पोलीस निरीक्षक जिविशा भंडारा.**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी**
**भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.